परिशिष्ट 'क' योजना क्र. 01

**कोविड कालावधीमध्ये कोविड मुळे पती मयत झालेल्या महिलेस स्वयंरोजगारासाठी साहित्य संच उपलब्ध करुन देण्याकरिता अर्थसहाय्य करणे.**

योजनेचा उद्देश :- कोविड कालावधीमध्ये ज्या महिलेचा पती कोविडमुळे मयत झालेला आहे अशा महिलेस स्वावलंबी होणेच्या दृष्टीने त्यांना स्वंयरोजगारासाठी मास्क / सेनिटायझर /हॅन्ड ग्लोज, मिरचीकांडप यंत्र/ शेवया मशिन/ पापड मशिन/ पिठाची गिरणी / कॅटरींग/ ब्युटीपार्लर व्यवसाय/तेल मशिन इ. साहित्य व इतर अनुषांगीक खर्च तसेच या व्यतिरिक्त त्यांच्या आवश्यकतेनुसार साहित्य घेणेकरीता अर्थसहाय्य देवून त्यांना स्वबळावर आत्मसन्मानाने उदनिर्वाह करता यावा, याकरीता स्वयंरोजगार सुरु करण्यास प्रोत्साहन देऊन त्यांचे सामाजिक व आर्थिक सक्षमिकरण करणे.

कार्यक्षेत्र :- नवी मंबई महानगरपालिका क्षेत्र

प्रस्तावित लाभार्थी संख्या :- प्राप्त अर्जातील पात्र अर्जानुसार

अनुदानाची रक्कम :- व्यवसाय सुरु करण्यासाठी महिलेला संपूर्ण हयातीत एकदाच रक्कम रू.1.00 लक्ष पर्यंतचे अर्थसहाय्य. (दोन टप्प्यात)

योजनेच्या अटी व शर्ती :-

**अ) अर्ज करणा-या महिलेच्या पतीचा मृत्यू खालील नमूद परिस्थितीत व 1 मार्च 2020 नंतर झालेला असावा.**

1. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर रूग्णालयात दाखल असताना मृत्यू झाल्यास.
2. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यास व त्यानंतर 14 दिवस गृह विलगीकरण काळात मृत्यू झाल्यास.
3. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर रूग्णालयातून उपचार घेवून घरी परतल्यानंतर (डिस्चार्जनंतर) 07 दिवसांतील गृह विलगीकरणातील मृत्यू.
4. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर रूग्णालयात उपचार घेवून घरी परतल्यानंतर पुन:श्च् कोविड उपचाराकरीता रूग्णालयात दाखल असताना झालेला मृत्यू.
5. कोविडमधून उपचार घेवून घरी आल्यानंतर म्युकरमायकोसिसमुळे घरी अथवा रुग्णालयातील वास्तव्य काळातील मृत्यू.
6. कोविड सदृश्य लक्षणे असल्यामुळे (covid suspect) रूग्णालयात दाखल असतानाचा मृत्यू.

**ब) अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे.**

- मयत पतिचे/ महिलेचे/ कुटुंबाचे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पतीच्या मृत्यू पुर्वी मागील लगतचे किमान 03 वर्ष वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून मालमत्ता धारक असल्यास मागील लगतच्या वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती/ निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ वीज बिल/ आधार कार्ड/ भाडे करारनामा/ पारपत्र (Pass Port)/ रेशनकार्ड / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल. (यापैकी 1 पुरावा)
- विवाह प्रमाणपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- पतिच्या मृत्युच्या दाखल्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- अर्जदाराचे वय वर्ष 18 ते 50 वर्षापर्यंतच्या महिलांना सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.
- पती व अर्जदाराचे आधारकार्डची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- अर्जदाराचे पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- ज्या साहीत्य/व्यवसाया करीता विशिष्ठ प्रकारचे प्रशिक्षण आवश्यक आहे अशा प्रकारचे प्रशिक्षण पुर्ण केलेबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- सदर प्रशिक्षण नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत दिले जात असेल तर या योजनेचा लाभार्थी सदर प्रशिक्षणाच्या लाभास पात्र ठरेल.
- कोविडमुळे पती मयत असलेल्या महिलांसाठी नवी मुंबई महानगरपालिके मार्फत अनुज्ञेय असलेल्या दोन्ही योजनांचा लाभ एका वेळी महिलेस घेता येईल.
- साहित्याची 50 टक्के रक्कम दरपत्रक (Quotation) सादर केल्यानंतर व उर्वरीत 50 टक्के रक्कम साहित्य खरेदी केल्यानंतर लाभार्थ्याच्या बँक खात्यामध्ये DBT द्वारे जमा करण्यात येतील.
- सदर अर्थसहाय्य महिलेला संपूर्ण हयातीत एकदाच देय असेल.
- साहित्य खरेदी केल्यानंतर त्याचे देयक (सर्व करांसहित असलेले ) सादर करणे आवश्यक आहे.
- अर्जासमवेत RTGS साठी बँकेचे पासबूकची अथवा रद्द धनादेशाची (Cancelled Cheque) छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो.

- महिलेच्या मयत पतीचा कोविड पॉझिटिव्ह असल्याचा अहवाल / कोविड संशयित रूग्णालयात दाखल असताना झालेला मयत संदर्भात रुग्णालयाच मृत्यू प्रमाणपत्र / घरी मुत्यु झाल्यास कोविड मृत्युचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे./रुग्णालयामधून घरी गेल्यावर 07 दिवसात मृत्यू झाला असल्यास रुग्णालयाचे डिस्चार्ज कार्ड.
- अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे स्व:साक्षांकीत केलेली असावीत.

**क) केंद्र शासन, राज्य शासन, व नवी मुंबई महानगरपालिकेव्दारा राबविण्यात येणा-या इतर योजनांच्या लाभा व्यतिरिक्त या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.**

महिला व बालकल्याण योजना या घटका अंतर्गत तरतुदीमधून :- अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून